MHKO160009262023

## नियमित दिवाणी दावा क्र.१६२/२०२३ मधील निशानी क्र. १६ वरील आदेश

**०१.** वादी यांनी प्रस्तुतचा दावा अतिक्रमण दुर करून कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादीने कथन केले आहे की, सदरचा दावा मे. कोर्टात दाखल असताना वादी यांच्या मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी अतिक्रमण करून घर बांधकाम केलेले आहे. सदर अतिक्रमण क्षेत्रातील पुर्ण झालेले घर बांधकाम हे ग्रामपंचायत करंजोशी येथे नोंद करणेकरिता प्रतिवादी यांनी अर्ज केला आहे. तथापि, वादी यांनी ग्रामपंचायतमध्ये सदर मिळकतीबाबत दावा चालु आहे नोंद करू नये म्हणुन तक्रार अर्ज देखिल दिलेला आहे. परंतु ग्रामपंचायत हे प्रतिवादी यांचे अर्जाचा विचार करू पाहत आहेत त्यामुळे सदर कामी ग्रामपंचायत करंजोशी यांना प्रतिवादी नं. २ म्हणुन पक्षकार करणे न्यायाचे व गरजेचे आहे. तसेच त्या अनुषंगाने दाव्यात इतर दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा. प्रस्तुतच्या अर्जावर ग्रामसेवक ग्रामपंचायत करंजोशी यांना नोटीस काढण्यात आलेली होती. नि.२१ वर ग्रामसेवक व सरपंच करंजोशी ग्रामपंचायत यांनी म्हणणे दाखल केलेले असुन त्यांनी कथन केलेले आहे की वादी व प्रतिवादी हे वारंवार त्यांचे कार्यालयाकडे हरकती, तक्रारी अर्ज देत आहेत त्यामुळे सदरकामी योग्य ते आदेश करण्यात यावेत.

**०२.** प्रतिवादींनी सदरच्या अर्जावर नि. २३ वर म्हणणे दाखल केले असुन त्यांनी कथन केले आहे की, वादीचे अर्जातील कथने खोटी व लबाडीची असल्याने त्यांना मान्य व कबुल नाहीत. ग्रामपंचायतचा प्रस्तुतच्या दाव्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. वादी यांनी प्रस्तुतचा दावा अतिक्रमण दुर करून कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामधुन ग्रामपंचायतचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप नाही अथवा सदर मिळकतीबाबत ग्रामपंचायतचा कोणताही संबंध येत नाही. त्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास कोणतेही तथ्य नाही. प्रतिवादी यांचे आर.सी.सी. घर बांधुन बरेच दिवस व वर्ष झालेले आहेत. त्या बाबतची नोंद ग्रामपंचायत दप्तरी कर आकारणी करिता नोंद घालणे व त्याचे

रेकॉर्ड सुस्थितीत ठेवणे हे ग्रामपंचायतचे काम आहे त्याकरिता ग्रामपंचायतीस वेठीस धरणे योग्य नाही. वादीने मागितलेल्या दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरूप बदलत आहे त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

०३. मी वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, वादी आणि प्रतिवादीं यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा अतिक्रमण दुर करून कब्जा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादी यांचे कथनानुसार प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये जनावरांसाठी छप्पर वजा शेड बांधलेले आहे व उर्वरित क्षेत्र पडसर आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. वादी यांनी नविन बांधकाम करण्याच्या इराद्याने दावा मिळकतीची मोजमापे घेतली असता एक गुंठे क्षेत्र कमी भरले तेव्हा प्रतिवादी यांनी ग्रामपंचायत रस्त्याला धरून वादी यांच्या दावा मिळकतीमध्ये एक गुंठे क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे समजुन आले. वादी यांनी प्रस्तुतचे अतिक्रमण काढुन घेणेस प्रतिवादींना सांगितले असता त्यांनी त्यास स्पष्टपणे नकार दिला. प्रतिवादींनी वादीचे क्षेत्र अतिक्रमण केले आहे अथवा नाही ही बाब दाव्याचे अंती शाबित होईल. प्रतिवादींचे घर हे वादीच्या मिळकतीत आहे अथवा नाही ही बाब सद्य स्थितीत स्पष्ट होत नाही. सदरच्या घराची नोंद ग्रामपंचायत सदरी करणेसाठी प्रतिवादीने अर्ज केल्याचे दिसुन येते. तसेच ग्रामपंचायत करंजोशी यांनी दाखल केलेल्या कथनांवरून देखिल वादी व प्रतिवादी हे वारंवार तक्रारी अर्ज देत असल्याचे निष्पन्न होते. सबब, या कामी ग्रामपंचायत करंजोशी यांना पक्षकार करणे गरजेचे दिसुन येत आहे. वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर न केल्यास दाव्यातील गुंतागुंत वाढणार आहे. तसेच वेगवेगळे दावे निर्माण होण्याची शक्यता आहे. सबब, वर नमूद कारणांवरून वादी यांची अर्जातील विनंती मान्य करण्यास पात्र आहे असे स्पष्ट होत आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज नि.१६ वादीने प्रतिवादींना र.रू.२००/- इतकी कॉस्ट देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वादीने पुढील तारेखपुर्वी आवश्यक ती दुरूस्ती करुन दुरूस्ती प्रत न्यायालयात हजर करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Shraddha Dinkar Bagal

**दिनांक- २२/०९/२०२५**

**( एस. डी. बागल )**
**सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**मलकापूर-शाहूवाडी, जि. कोल्हापूर.**